दूरध्वनी क्रमांक : २२०४१८०३/
२२०४२८६६

क्र. निशि/मागणी/२०१६/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. १
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

दिनांक - ०२/०१/२०१६

प्रति,

१. सर्व उपनियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये
२. सर्व शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये

विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे मासिक नियतन
माहे फेब्रुवारी, २०१६.

संदर्भ :- क्र.असुका-२०१५/प्र.क्र. ३९/नापु. २२, दि . १९ नोव्हेंबर, २०१५

उपरोक्त संदर्भाधीन शासनपत्रान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे फेब्रुवारी, २०१६ करीता [illegible] प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी सदस्य संख्येसाठी २५०२२ मे. टन तांदूळ व २००३२ मे. टन गहू असे एकूण ४५०५४ मे. टन अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. प्रत्यक्षात माहे नोव्हेंबर, २०१५ अखेरची प्राधान्य कुटुंब योजनेची लोकसंख्या ही ८८४५११२ अशी आहे.

सदर नियतनाच्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी, २०१६ करिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे परिमाण प्रति व्यक्ति ५ किलो अन्नधान्य (<u>तांदूळ २ किलो व गहू ३ किलो</u>) असे आहे.

शासन पत्र क्र. असुका/२०१४/प्रक्र.१०६/ना.पु.२२, दि. १ ऑगस्ट, २०१४ अन्वये प्राप्त सुचनेनुसार प्रत्येक महिन्याच्या नियतनाची उचल ही त्या पूर्वीच्या महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार संपुर्ण नियतनाची उचल नियतनाच्या मागील महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत पूर्ण होईल व लाभार्थ्यांना विहित वेळेत धान्य पुरवठा केला जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी, तसेच यापुढे भारतीय अन्न महामंडळाकडून तसेच केंद्र शासनाकडून मुदतवाढ दिली जाणार नसल्याने सदर सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सुचित केले आहे.

सर्व परिमंडळ कार्यालयांकडून माहे नोव्हेंबर, २०१५ अखेरची प्राधान्य कुटुंब योजनेची शिधापत्रिका व लोकसंख्या बाबतची माहिती संगणकावर भरण्यात आली असून त्यानुसार एकूण लोकसंख्या ही ८८४५११२ अशी आहे. तसेच, अ.शि.दुकानांमध्ये माहे डिसेंबर, २०१५ अखेरच्या शिल्लक साठ्याबाबतची माहिती परिमंडळ कार्यालयांकडून संगणकावर भरण्यात आली आहे.

सदर माहितीनुसार परिमंडळनिहाय अधिकृत शिधावाटप दुकानातून माहे डिसेंबर, २०१५ अखेर शिल्लक असलेला साठा, तसेच, माहे जानेवारी, २०१६ च नियतनातील "माहे फेब्रुवारी, २०१६ करीता

शिल्लक ठेवावयाचा साठा" या शिर्षकाखाली दर्शविण्यात आलेला साठा याची परिमंडळ निहाय आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

(आकडे मे. टन मध्ये)

| परिमंडळ | माहे नोव्हेंबर, २०१५ अखेरच्या शिधापत्रिका व लोकसंख्या. | | अ.शि.वा.दुकानातील माहे डिसेंबर, २०१५ अखेरचा शिल्लक साठा | | दि. ०२.१२.२०१५ रोजी निर्गमित माहे जानेवारी, २०१६ चे नियतनातील अ.शि.वा.दुकानातून "माहे फेब्रुवारी, २०१६ करीता शिल्लक ठेवावयाचा साठा" | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| अ | २१९५४२ | ९६६३०५ | २४९.२५२ | ४०१.२५१ | ०.००० | ०.००० |
| ड | २४७४२९ | ११०२३९१ | १२७.०४४ | २३७.४०७ | ०.००० | ०.००० |
| ई | ५२७४९० | २३३३३१६ | २२७.७२२ | ४०८.०३७ | ०.६५३ | ७.८८६ |
| ग | २७१५१३ | १२१८४८७ | १७८.२१५ | २७२.६६७ | ०.००० | ०.००० |
| फ | ६८६६२४ | ३०४६०७३ | २१५.३१२ | ३५१.९०३ | ०.००० | ०.००० |
| एकूण | १९६२५८८ | ८८४५११२ | १०३७.५४६ | १६६७.२५३ | ०.६५३ | ७.८८६ |

उपरोल्लेखित तक्त्यामधील दोन्ही रकान्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या अन्नधान्य साठयानुसार संबंधित शिधावाटप दुकाननिहाय मंजूर नियतनात वजाती करण्यात आल्या आहेत.

उपरोल्लेखित शिल्लक साठा हा मागील अधिकृत शिधावाटप दुकानात उपलब्ध असून प्रत्यक्षात त्या दुकानाची १००% आवश्यकता पूर्ण झाल्याने त्या दुकानांचे समोर मंजूर नियतनात ०.०० (निरंक) अशी आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. सदर नियतन हे व्यक्तीनिहाय व दुकाननिहाय मंजूर करण्यात येत असल्याने वजा (उदा.-३५,-४५ वगैरे) आकडेवारी दुकाननिहाय नियतनात दर्शविल्यास त्या शिधावाटप कार्यालयाने एकूण मंजूर नियतन प्रत्यक्ष गरजेपेक्षा कमी होत असून अन्य शिधापत्रिकाधारक वंचित राहू नयेत म्हणून सदर अतिरिक्त साठा हा सदर रकान्यात दर्शविण्यात येत आहे. त्यानुसार मंजूर नियतनाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

<u>माहे फेब्रुवारी, २०१६ करीता प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत परिमंडळनिहाय मंजूर नियतन</u>

(आकडे मे. टन मध्ये)

| अ.क्र. | परिमंडळ | मासिक आवश्यकता (१००% गरज) | | माहे फेब्रुवारी, २०१६ करिता मंजूर नियतन | | अ.शि.दुकानातून माहे मार्च, २०१६ करिता शिल्लक ठेवावयाचा साठा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| १ | अ | ३०३२.६३० | ३८९८.९१५ | २६७३.३५८ | ३४८१.६५६ | ०.००० | ०.००० |
| २ | ड | २२०४.७८२ | ३३०७.१७३ | २०६७.७३८ | ३०८१.७६६ | ०.००० | ०.००० |
| ३ | ई | ५०२४.३१२ | ७५२६.४६८ | ४७८६.२९३ | ७१२८.००७ | ०.३५७ | ७.४४२ |
| ४ | ग | २४३६.३७४ | ३६५४.५६१ | २२५८.१५१ | ३३८१.८९४ | ०.००० | ०.००० |
| ५ | फ | ६०९२.१५६ | ९१३८.२१९ | ५८७५.८३४ | ८७७८.३१६ | ०.००० | ०.००० |
| | एकूण | १७६१०.२२४ | २६४३५.३३६ | १६६७२.३८२ | २४८६७.६३१ | ०.३५७ | ७.४४२ |

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना विहीत वेळेत अन्नधान्य पोहोचण्याच्या व उचल पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून माहे फेब्रुवारी, २०१६ करीता प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी वितरण आदेश तातडीने प्राप्त करून घेण्याच्या सूचना संघटीत संस्थांना द्याव्यात. तथापि १००% वितरण आदेश दिनांक २१.०१.२०१६ पर्यंत प्राप्त करून घ्यावेत. संलग्न संस्था तसेच थेट उचल करणाऱ्या दुकानांनी या योजनेतील अन्नधान्याची उचल कोणत्याही परिस्थितीत दि. १५.०१.२०१६ पर्यंत ५०%, दि. २५.०१.२०१६ पर्यंत ८०% व दि. ३१.०१.२०१६ पर्यंत १००% उचल पूर्ण करावी.

ज्या अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये मासिक गरजेपेक्षा जास्त साठा शिल्लक आहे, अशा दुकानांमधून मासिक १००% गरजेपेक्षा जास्त वितरण होणार नाही व अतिरिक्त साठा पुढील महिन्यासाठी दुकानात शिल्लक राहील याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत देण्यात याव्यात.

**तसेच, संदर्भाधीन शासनपत्रान्वये खालीलप्रमाणे सुचना देण्यात आल्या असून त्याचे पालन करण्यात यावे.**

अ) सदर नियतन मंजूरीचे दुकाननिहाय तक्ते ई-मेलद्वारे परिमंडळ कार्यालयांना पाठविण्यात आले आहेत. दुकाननिहाय नियतन प्राप्त न झाल्याने धान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

ब) भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करूनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

तसेच, सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर उपसंचालक नागरी पुरवठा (पो/ता) कार्यालयाने तात्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासन नियतन आदेशापूर्वी शासनास प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

क) सदर धान्य राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कार्यपद्धतीप्रमाणे वितरीत करण्याची सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांनी दक्षता घेण्यात यावी. शिधापत्रिकाधारकांस अ.शि.दुकानांच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी अन्नधान्याची मागणी न नोंदविल्यास अथवा संघटित संस्थांनी मुदतीत १०० % धान्याची उचल न केल्यास त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या शिधाजिन्नसांचा गैरव्यवहार होणार नाही याची दक्षता उप नियंत्रक शिधावाटप व शिधावाटप कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी घ्यावी. त्यासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या मानकाप्रमाणे व रोस्टरनुसार नियमित व अचानक तपासण्या कराव्यात. तसेच या कार्यालयाचे परिपत्रक दि. २२/०७/२००९, दि. ३०/०७/२००९ तसेच अन्नधान्य वाहतूकीचे ट्रॅकिंग बाबतचे परिपत्रक दिनांक १८/०९/२०१४ मध्ये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सदर माहे फेब्रुवारी, २०१६ च्या प्राधान्य कुटुंब योजनेच्या नियतनापैकी उचल व वाटप केलेल्या अन्नधान्याचा साप्ताहिक तसेच पाक्षिक अहवाल न चुकता या कार्यालयास तसेच उपसंचालक, नागरी पुरवठा (मो/मा) यांना पाठवावा.

नियंत्रक शिधावाटप व<br>
संचालक नागरी पुरवठा<br>
मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि सासंवि, मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई,ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका(संबंधीत परिमंडळामार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी. मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीतपरिमंडळामार्फत)
६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई
९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७३ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, ..आर.मुना ४,सी - ४,लेन- ८, सेक्टर ९ सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई १४.
१२. श्री. रवळकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घनःश्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुं-५८